" स्वप्न सत्य "

स्वप्ने कधी खरी असतात का ?
मग काही स्वप्ने बोलकी कशी ?
निश्चिंत झोपलेल्याला खरंच का
संवेदना जाणवीतात ? ‖

स्वप्ने ही मनाचा खेळ
जणू अणु रेणूंची माळ
दृशअदृशांचा मेळ
जसा बुद्धीचा कल्लोळ ‖

स्वप्ने हा आभास
अति तीव्र संवेदनांचा घोळ
देही विदेही राहूनही
करीत असतो मानवाचा सांभाळ ‖

जीवित जिवंत स्वप्ने खरी असतात
जेथे कार्य कारणे जागृत असतात
ज्यात कर्तृत्वाची स्वप्ने असतात
आणि तीच खरी स्वप्ने असतात ‖

मनोहर पाटील.

२०ऑक्टो,२०११. ओर्लान्डो, फ्लोरिडा. USA